मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# टीपी स्कीम रद्द; चिखली ग्रामस्थांचा आनंदोत्सव!

## फटाक्यांच्या आतिषबाजी, पेढे वाटून गावाने तोंड केले गोड : भूमिपुत्रांचा लढा अखेर यशस्वी

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली, कुदळवाडी भागामध्ये टीपी स्कीम राबवण्याचा घाट पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने घालण्यात आला होता. या भागातील हजारो एकर जागेमध्ये आरक्षणे टाकून यामध्ये महापालिकेच्या प्रकल्प योजना राबवण्याचे प्रस्तावित होते. मात्र या स्कीम विरोधात येथील भूमिपुत्रांनी जोरदार लढा दिला. संघर्षाची भूमिका ठेवली. अखेर प्रशासनाला यामुळे दोन पाऊल मागे यावे लागले. नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रशासनाच्या वतीने चिखली कुदळवाडीतील प्रस्तावित टीपी स्कीम रद्द करण्यात आली असून यानंतर येथील ग्रामस्थ, भूमिपुत्रांनी अक्षरशः दिवाळी साजरी केली. फटाक्यांची आतिषबाजी



करत संपूर्ण गावाने एकमेकांना पेढे भरवले.

पिंपरी चिंचवड महापालिकेचा शहर विकास आराखडा नुकताच जाहीर करण्यात आला. या शहर आराखड्यात व्यतिरिक्त चिखली कुदळवाडी आणि चऱ्होली या भागामध्ये टीपी स्कीम राबवण्याचा प्रस्ताव होता. मात्र या टी पी स्कीम विरोधात ग्रामस्थांनी आक्रमक पवित्र घेतला.

आमचा जीव गेला तरी बेहत्तर पण "टीपी" होऊ देणार नाही, अशा अत्यंत कठोर शब्दांत ग्रामस्थांनी भावना व्यक्त केल्या होत्या. महापालिका प्रशासनाचा निषेध म्हणून टीपी स्किम बाबत महापालिकेने दिलेल्या जाहीर प्रकटनाची होळी यावेळी करण्यात आली होती. यानंतर ग्रामस्थांचा आक्रमक विरोध संघर्षाची ठिणगी

### चिखली ग्रामस्थांची दिवाळी

» दरम्यान हा प्रस्ताव फेटाळण्यात आल्यानंतर चिखली कुदळवाडीतील ग्रामस्थांनी अक्षरशः दिवाळी साजरी केली. संपूर्ण गावाने एकमेकांना पेढे भरवत तोंड गोड केले. फटाक्यांच्या जोरदार आतिशबाजी देखील यावेळी करण्यात आली.चिखली कुदळवाडीच्या जमिनी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणात गेल्या. महापालिकेच्या आरक्षणातही मोठे क्षेत्र गेले आहे. स्वस्त घरकूलासाठी १०० एकर क्षेत्र घेतले. यापूर्वीच या भागातील रस्त्यांसाठी देखील जमीन संपादित करण्यात आली. उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने कुदळवाडी चिखली परिसरातच जागा शिल्लक असताना अतिक्रमणांच्या नावाखाली कुदळवाडी आणि आसपासची अनेक गावातील जमिनीवर बुलडोझर फिरवला. त्यामुळेच टीपी स्कीम बाबत ग्रामस्थांचा विरोध होता ग्रामस्थांची लढाई अखेर यशस्वी ठरल्याच्या भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

पाहून प्रशासन दोन पाऊल मागे आले आहे.नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत शहर विकास आराखड्याला मंजुरी देत टीपी स्कीम चा प्रस्ताव फेटाळण्यात आला आहे.

---

# सार्वजनिक वाहतूकीसाठी बीआरटीएस कॉरिडॉर ठरत आहेत उपयुक्त!

## बीआरटीएसमार्फत दररोज सुमारे 2 लाख 40 हजार प्रवासी घेत आहेत लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रातील ११ लाख पीएमपीएमएल प्रवाशांपैकी सुमारे २२ टक्के प्रवासी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असणाऱ्या बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टम अर्थात बीआरटीएस कॉरिडॉरचा वापर करीत आहेत. पीएमपीएमएलच्या उपलब्ध आकडेवारीनुसार सध्या बीआरटीएसमार्फत दररोज २ लाख ४० हजार प्रवासी प्रवास करीत आहेत. त्यामुळे ही सेवा पिंपरी चिंचवड शहरातील अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा ठरली आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये सध्या निगडी-दापोडी, दिघी-आळंदी, सांगवी-किवळे, काळेवाडी-चिखली आणि नाशिक फाटा-वाकड असे पाच बीआरटीएस कॉरिडॉर कार्यरत आहेत. हे कॉरिडॉर शहराच्या पूर्व - पश्चिम व उत्तर - दक्षिण भागांतील महत्त्वाच्या जवळपास १११ मार्गांना जोडतात. त्यामुळे ही सेवा एकप्रकारे पिंपरी चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक रचनेचा कणा ठरत आहेत. शहरातील अंदाजे सुमारे ९६ टक्के लोकसंख्या बस थांब्याच्या ५०० मीटर अंतरात राहते. बीआरटीएसच्या स्वतंत्र मार्गिका आणि प्रवाशांची गर्दी असणाऱ्या वेळेत बसची दीड ते सहा मिनिटांच्या फ्रीक्वेन्सीमुळे प्रवासाचा वेळ कमी होत असल्याने प्रवाशांकडून ही सेवा वापरण्यात प्राधान्य दिले जात आहे. तसेच बसला गर्दी होत असल्याने रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होत आहे.



### वाहतूक सेवेची क्षमता वाढवली जाणार...

पिंपरी-चिंचवड महापालिकेने सार्वजनिक वाहतूक ताफ्यात वाढ करण्याची प्रक्रिया आधीच सुरू केली आहे. विविध योजना आणि खरेदी मोहिमांद्वारे एकूण 2,400 बस पीएमपीएमएलच्या ताफ्यात समाविष्ट केल्या जात आहेत. यामध्ये पीएमपीएमएलने आधीच खरेदी केलेल्या 400 नवीन सीएनजी बसांचा समावेश आहे, तसेच पीएमआरडीएकडून 500 बस आणि पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांच्या सहाय्याने आणखी 500 बस उपलब्ध होणार आहेत. याव्यतिरिक्त, केंद्र सरकारच्या योजनांतून आणखी 1,000 बस मिळण्याची अपेक्षा आहे.

याशिवाय, गृहनिर्माण व

### कॉरिडॉरनुसार अशी सुरु आहे सेवा...

» निगडी–दापोडी कॉरिडॉर : दररोज एकूण बस फेऱ्या १ हजार ८०० पेक्षा जास्त, तर प्रवाशांची संख्या ९० हजारांपेक्षा जास्त.

» दिघी-आळंदी कॉरिडॉर : दररोज एकूण बस फेऱ्या १ हजार १०० पेक्षा जास्त, तर प्रवाशांची संख्या ६५ हजार ८०० पेक्षा जास्त.

» सांगवी-किवळे कॉरिडॉर : दररोज एकूण बस फेऱ्या १ हजार १०० पेक्षा जास्त, तर प्रवाशांची संख्या ५९ हजार ५०० पेक्षा जास्त.

» काळेवाडी–चिखली कॉरिडॉर : दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या १९ हजारांपेक्षा जास्त.

» नाशिक फाटा-वाकड कॉरिडॉर : दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या १० हजार ६०० पेक्षा जास्त.

» पाच कॉरिडॉरवर मिळून दररोज होणाऱ्या एकूण बस फेऱ्या सुमारे ४ हजार ६०० व एकूण प्रवासी संख्या २ लाख ४५ हजार.

शहरी व्यवहार मंत्रालयाने केलेल्या सूचनेनुसार, पुणे आणि पिंपरी चिंचवडसारख्या शहरांनी सार्वजनिक वाहतूक सेवा सुरळीत चालण्यासाठी २०३१ पर्यंत ८ हजार १०० बसेस उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यादृष्टिनेही नियोजन करण्यात येत आहे.

# महावितरण, एमएनजीएलची खोदाई बंद

## महापालिकेचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

'शहरात विविध कामांसाठी खोदण्यात आलेले रस्ते दुरुस्त करण्याचे काम महापालिकेने सुरू केले असून, महावितरण, गॅस पाइपलाइनसाठी देण्यात आलेली परवानगी संपली आहे. त्यामुळे आता रस्त्यांवर महावितरण, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड कंपनीला (एमएनजीएल) खोदाई करता येणार नाही,' अशी माहिती महापालिकेचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. अत्यावश्यक आणि तातडीच्या कामासाठीच आता रस्ते खोदाईसाठी परवानगी दिली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




> पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील खोदलेले रस्ते पूर्ववत करण्याची जबाबदारी पथ विभागाची असते. यंदाच्या वर्षी १५ मेपर्यंत परवानगी देण्यात आली होती. आता पुढील १५ दिवसांत रस्ते दुरुस्तीची कामे पूर्ण केली जातील.
>
> **- अनिरुद्ध पावसकर, पथ विभागप्रमुख, पुणे महापालिका.**

महापालिकेच्या पथ विभागाच्या वतीने दर वर्षी विविध कामे करण्यासाठी रस्तेखोदाईची परवानगी दिली जाते. ही परवानगी देताना आवश्यक ते शुल्क घेतले जाते. खासगी मोबाईल कंपन्या, महावितरण, एमएनजीएल याबरोबरच महापालिकेच्या पाणीपुरवठा, मलनि:सारण विभागाला विविध कामांसाठी ही परवानगी दिली जाते. ती ३१ मेपर्यंत असते. मात्र, यंदा महापालिकेने परवानगी १५ मे पर्यंत दिली होती. ही मुदत गुरुवारी संपल्याने महापालिकेने महावितरण तसेच एमएनजीएल कंपन्यांना पत्र पाठवून परवानगी संपल्याचे कळविल्याचे पावसकर यांनी सांगितले.

परवानगी संपल्याने आता या दोन्ही कंपन्यांना शहरातील कोणत्याही भागांत रस्ते खोदाई करता येणार नाही. महापालिकेच्या पत्राकडे दुर्लक्ष करून खोदाई केल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे. रस्ते खोदाईची परवानगी संपल्याने ३१ मे पर्यंत खोदलेले हे सर्व रस्ते दुरुस्त करण्याचे काम पथ विभागाच्या वतीने पूर्ण केले जाणार असल्याचे पथ विभागाने स्पष्ट केले.

पोलिसांना ३१ मेपर्यंत मुदतशहराच्या सुरक्षेसाठी पुणे पोलिसांकडून विविध ठिकाणी १२०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जाणार आहेत. यासाठी महापालिकेने रस्तेखोदाईची परवानगी दिली होती. या प्रकल्पासाठी खोदले जाणारे रस्ते दुरुस्त करण्याचे काम संबंधित ठेकेदार करणार असल्याने पोलिसांना ३१ मेपर्यंत रस्तेखोदाई आणि दुरुस्तीची मुदत असणार आहे. तसेच, महापालिकेच्या समान पाणी योजना, आपत्ती व्यवस्थापन कक्षासाठी ओएफसी केबल टाकण्याच्या कामासाठी ३१ मेपर्यंत मुदत असणार आहे. त्यानंतर या विभागांनाही कोणतीही खोदाई करता येणार नाही. १ ऑक्टोबरनंतरच त्यांना खोदाईसाठी परवानगी दिली जाणार असल्याचे अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.

---

# पुण्यात नालेसफाईची 85 टक्के कामे पूर्ण

## पुणे महापालिका प्रशासनाचा दावा : महापालिका हद्दीत 647 किमी नाले

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाकडून शहरातील नाले, पावसाळी लाईन, चेंबर दुरुस्ती व साफसफाईची कामे हाती घेतली असून नालेसफाईची ८५.७१ टक्के कामे पूर्ण झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.



### महापालिका हद्दीत 647 किमी नाले

- महापालिकेच्या जुन्या हद्दीत २३४ मुख्य व उपनाले आहेत.
- समाविष्ट ११ गावांमध्ये १६४ मुख्य व उपनाले आहेत.
- समाविष्ट २३ गावांमध्ये प्राथमिक सर्वेनुसार ४२ मुख्य व उपनाले आहेत.
- यांवर ८० कल्व्हर्ट व १२ बंधारे आहेत.
- पावसाळी गटारी - ३२५ किमी
- चेंबरची संख्या - ५५,३००

> पावसाळी पूर्व कामे मुदतीत पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. महापालिका आणि समाविष्ट गावांमध्ये सुमारे २५ कोटी रुपयांचे कामे केली जात आहेत. त्यात १५ क्षेत्रीय कार्यालयामध्ये १३.४० कोटी रुपयांची तर समाविष्ट २३ गावांमध्ये सुमारे १२ कोटी रुपयांची कामे प्रत्यक्षात सुरु आहेत. काही कामे कोणत्याही परिस्थितीत ७ जूनपूर्वी पूर्ण केली जाणार आहेत.
>
> **- संतोष तांदळे, अधीक्षक अभियंता, ड्रेनेज विभाग मनपा, पुणे.**

महापालिकेकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी शहरातील ओढे, नाले, पावसाळी गटारे, चेंबर आदींची साफसफाई आणि राडारोडा उचलण्याची कामे केली जातात. तसेच रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी डांबरीकरण केले जाते. ही कामे दरवर्षी एप्रिलमध्ये सुरू करून पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले जाते. मात्र, लहान लहान पावसामुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरते, चेंबर तुंबतात, रस्त्यावर पाणी साचते. त्यामुळे पावसाळी कामे होण्यावर संशय व्यक्त केला जातो.

महापालिका प्रशासनाने यंदाही पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांसाठी वेगवेगळ्या निविदा काढल्या आहेत. क्षेत्रीय कार्यालयामार्फत २३ निविदा काढण्यात आल्या. तर समाविष्ट २३ गावांसाठी आठ अशा एकूण ३१ निविदा काढण्यात आल्या आहेत. या निविदाही दरवर्षीप्रमाणे कमी दरानेच आलेल्या आहेत. ही मे अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले आहे. महापालिका प्रशासनाने आत्तापर्यंत ८५.७१ टक्के नालेसफाई झाल्याचा दावा केला आहे. ही कामे करण्यासाठी ७ जूनचे उद्दिष्ट ठेवले असून, ही कामे वेळेत पूर्ण करायचे आहे.

# पालिका शाळा विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी शैक्षणिक किट

## ई-रुपी डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे वितरण करणार;पिंपरी चिंचवड महापालिकेचा उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसांपासून म्हणजेच 15 जून 2025 पासूनच शैक्षणिक साहित्यांचा समावेश असणारे एक किट देण्यात येणार आहे. पालिकेच्या शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना शैक्षणिक साहित्याचा अभाव असल्यामुळे अडचण येऊ नये, यासाठी लवकरात लवकर शैक्षणिक किटचे वितरण पूर्ण व्हावे, याद्दष्टीने पालिका प्रशासनाने नियोजन केले आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक किट वितरण प्रक्रिया ई-रुपी या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे पूर्ण केली जाणार आहे.

यंदाच्या वर्षी बालवाडीच्या विद्यार्थ्यांनाही डीबीटी योजनेचा लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आता बालवाडीतील विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक किट मिळेल. या किटमध्ये टिफिन बॉक्स आणि चित्र काढण्यासाठी उपयुक्त असे रंग, यासारख्या नवीन वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेट लाभ हस्तांतरण उपक्रमांतर्गत ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. ज्यामध्ये ई-रुपी डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे सुरक्षित, रोखविरहित व्यवहार करून विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरविले जाते. या किटमध्ये यंदा पालक आणि शाळांकडून मिळालेल्या अभिप्रायाचा विचार करून काही नवीन वस्तूंचा समावेश करण्यात आला आहे. नामांकित कंपन्यांच्या शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक असणाऱ्या वस्तू या किटमध्ये आहेत.मागील वर्षी ई-रुपी प्रणाली अंतर्गत 51 हजार 203 विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले होते. तर, यावर्षी बालवाडी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसांपासून म्हणजेच 15 जून 2025 पासूनच शैक्षणिक साहित्यांचा समावेश असणारे एक किट देण्यात येणार आहे. पालिकेच्या शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला आहे



### पोलिस आयुक्तालयांमध्ये मोठी स्पर्धा

» प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी राज्यभरातील पोलिस आयुक्तालयांमध्ये मोठी स्पर्धा पाहायला मिळाली. कार्यालयीन स्वच्छता, सेवा वितरणातील गतिशीलता, औद्योगिक संवाद, तक्रार निवारणातील गती, प्रशासनिक पारदर्शकता यावर गुणांकन करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेमुळे संपूर्ण राज्यातील पोलिस ठाणी कात टाकत चकाचक झाल्याचे दिसून येत आहे.

### अशी आहे ई-रुपी प्रक्रिया

» -ई-रुपी हे एक डिजिटल व्हाउचर असून यासाठी बँक खाते आवश्यक नाही-यामध्ये लाभार्थ्यांना एसएमएस द्वारे प्री-पेड क्युआर कोड व्हाउचर प्राप्त होते-हे व्हाउचर केवळ शाळा साहित्य खरेदीसाठीच वापरता येते-यासाठी फक्त 10 अंकी वैध संपर्क क्रमांक आवश्यक-अतिरिक्त सुरक्षेसाठी ओटीपी द्वारे व्यवहार पडताळणी होते

“ थेट लाभ हस्तांतरण योजनेंतर्गत शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवसांपासूनच शैक्षणिक किटचे वितरण सुरू केले जाईल. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणाची समान संधी देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. डीबीटी यंत्रणेत सुधारणा करून आणि किटमध्ये उपयुक्त वस्तूंचा समावेश करून विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी सक्षम बनवण्यासाठी आमचे प्राधान्य आहे

- शेखर सिंह,आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

“ पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ई-रुपी आधारित डीबीटी प्रक्रियेद्वारे शैक्षणिक किटचे वाटप करण्यात येईल. विद्यार्थ्यांपर्यंत जलद, पारदर्शकपणे लाभ पोहोचवण्यासाठी ई-रुपी डीबीटी मॉडेल उपयुक्त ठरत आहे. यावर्षीच्या सुधारित प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या गरजा लक्षात घेऊन प्रक्रिया आणखी प्रभावी करण्यात आली आहे.

- प्रदीप जांभळे पाटील,अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# अवकाळी पावसाने आयटी परिसर झोडपला

## पहिल्याच पावसात रस्ते तुंबले, वाहनचालकांची तारांबळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

आयटी परीसरात गुरूवारी (दि. 15 ) दुपारच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसाने हिंजवडी, माण, मारुंजी परिसर चांगलाच झोडपून काढला. तर पहिल्याच पावसात आयटी परिसरातील अनेक रस्ते तुंबले असल्याने रस्त्यातून मार्ग काढताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागली.

मागील काही दिवस जाणवणाऱ्या उकाड्याने नागरिक त्रस्त झाले होते. अचानक आलेल्या जोरदार पावसाने वातावरणात गारवा तयार केला. अनेक शेतकऱ्यांची काढणीस आलेली उन्हाळी बाजरीची पिके भुईसपाट झाली. त्यामुळे या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला.

हिंजवडी माण ,मारुंजी, नेरे, जांबे, कासारसाई परिसरात चांगला दमदार पाऊस झाल्याने बागायती पिकांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांचे कांद्याचे पीक धोक्यात आले असून काही जणांचे काढलेले कांदे भिजले. काही शेतकऱ्यांची वखारीत कांदे टाकण्याची लगबग सुरू होती. मात्र धो धो पाऊस बरसल्याने कांदे भिजून मोठे नुकसान झाले.

हिंजवंडी, माण व मारुंजी रस्त्यांवर दुकानदारानी लगतची गटारे बुजविल्याने अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी वाहत होते. त्यामुळे पहिल्याच पावसात चक्का जाम झाल्याचे पाहायला मिळाले. पाण्यातुन वाट काढतांना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत होती

माण, नेरे, जांबे भागातील वीटभट्टी मालकांना अवकाळी पावसाचा फटका बसला. अनेकांनी मोठमोठ्या ताडपत्र्या आणून वीट भट्ट्या झाकल्या होत्या. मात्र या पावसात थापलेल्या कच्च्या विटा भिजल्याने व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाल्याचे वीट उत्पादकांनी सांगितले.



### रस्त्यांवर चोहीकडे पाणीच पाणी

» हिंजवंडी, माण व मारुंजी रस्त्यांवर दुकानदारानी लगतची गटारे बुजविल्याने अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी वाहत होते. त्यामुळे पहिल्याच पावसात चक्का जाम झाल्याचे पाहायला मिळाले. पाण्यातुन वाट काढतांना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत होती. तर काही ठिकाणी रस्त्यावर ऑइल सांडल्याने त्यावरून घसरून दुचाकीस्वार पडले

# निमगाव भोगीत प्रदूषणाचा विळखा

## ग्रामस्थांची शरद पवार, उदय सामंत यांच्याकडे न्यायाची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

"आम्ही नाईलाजास्तव निमगाव भोगीत राहतोय, पण यापुढे आमच्या पिढ्यांचं जगणं अशक्य आहे. प्रदूषणामुळे जमिनी नापीक झाल्या, त्या कुणी घेत नाही. एमआयडीसी आली, पण आमच्या नशिबी ससेहोलपटच आली," अशी व्यथा निमगाव भोगीच्या ग्रामस्थांनी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासमोर मांडली. प्रदूषणाच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा आणि नुकसानभरपाईची मागणी त्यांनी केली.

शिरूर तालुक्यातील माळरानावर एमआयडीसी आणि चासकमान-डिंभा कालव्याच्या पाण्याने समृद्धी आली, पण निमगाव भोगी येथील प्रदूषणाच्या समस्येने ग्रामस्थांचे जगणे असह्य झाले आहे. एमईपीएल कंपनीच्या जलप्रदूषणामुळे शेती नापीक झाली, जनावरे मरत आहेत, तर कर्करोग आणि किडनीच्या आजारांनी लोक त्रस्त आहेत, अशी माहिती स्थानिकांनी शरद पवार यांना दिली.



### ग्रामस्थांचा आक्रोश

» गावच्या सरपंच ज्योती लक्ष्मण सांबारे यांनी गेल्या १५ वर्षांपासून एमईपीएल कंपनीच्या प्रदूषणामुळे गावकऱ्यांनी सहन केलेल्या त्रासाचा पाढा वाचला. "शेती, जनावरे आणि माणसांचे आरोग्य उद्ध्वस्त झाले. आम्हाला न्याय मिळालाच पाहिजे," अशी मागणी त्यांनी लावून धरली. खासदार अमोल कोल्हे यांनीही ग्रामस्थांच्या भावना मांडत या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे सांगितले.

"इथलं चित्र धक्कादायक आहे. उद्योग आणि पर्यावरण विभागाने यावर अंतिम निर्णय घ्यावा. कंपनीला जादा जमीन देण्याचा निर्णय सरकारने स्थगित करावा. शेती आणि जनावरांच्या नुकसानाची भरपाई देण्यासाठी मंत्रिमंडळात निर्णय व्हावा," असे त्यांनी मनोगतात सांगितले. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. "निमगाव भोगीच्या नागरिकांच्या यातनांकडे दुर्लक्ष होणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

गावच्या सरपंच ज्योती लक्ष्मण सांबारे यांनी गेल्या १५ वर्षांपासून एमईपीएल कंपनीच्या प्रदूषणामुळे गावकऱ्यांनी सहन केलेल्या त्रासाचा पाढा वाचला. "शेती, जनावरे आणि माणसांचे आरोग्य उद्ध्वस्त झाले. आम्हाला न्याय मिळालाच पाहिजे," अशी मागणी त्यांनी लावून धरली.

यावेळी माजी आमदार अशोक पवार, सूर्यकांत पलांडे, विकास लवांडे, देवदत्त निकम, सतीश पाचंगे, शेखर पाचुंदकर, विक्रम पाचुंदकर, राहुल गवारे, शशिकांत दसगुडे, यशवंत पाचंगे, भीमराव रासकर, बापूसाहेब शिंदे, संदीप शिंदे, विश्वास ढमढेरे, पूजा गणेश कर्डीले, मल्हारी काळे, कुमार नाणेकर, नाना फुलसुंदर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश थोरात यांनी केले, तर पांडुरंग अण्णा थोरात यांनी आभार मानले.

निमगाव भोगीतील प्रदूषणाचा प्रश्न मार्गी लागावा आणि ग्रामस्थांना नुकसानभरपाईसह न्याय मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शरद पवार आणि उदय सामंत यांच्या भेटीने ग्रामस्थांना आशेचा किरण दिसू लागला आहे.

### शरद पवारांचे आश्वासन

» निमगाव भोगीतील प्रदूषणाचा प्रश्न ऐकून शरद पवार यांनी चिंता व्यक्त केली. "इथलं चित्र धक्कादायक आहे. उद्योग आणि पर्यावरण विभागाने यावर अंतिम निर्णय घ्यावा. कंपनीला जादा जमीन देण्याचा निर्णय सरकारने स्थगित करावा. शेती आणि जनावरांच्या नुकसानाची भरपाई देण्यासाठी मंत्रिमंडळात निर्णय व्हावा," असे त्यांनी मनोगतात सांगितले.

### उदय सामंतांचे वचन

» उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. "निमगाव भोगीच्या नागरिकांच्या यातनांकडे दुर्लक्ष होणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

# बँक ऑफ महाराष्ट्रची सेवा विस्कळीत; वाल्हे शाखेतील प्रकार

## बँकेच्या ग्राहकांची मोठी गैरसोय होत असून पैसे काढण्यास असंख्य अडथळे निर्माण होत आहेत.आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

बँक ऑफ महाराष्ट्र वाल्हे (ता.पुरंदर) शाखेची सेवा मागील आठवड्यापासून विस्कळीत झाली आहे. यामुळे बँकेच्या ग्राहकांची मोठी गैरसोय होत असून पैसे काढण्यास असंख्य अडथळे निर्माण होत आहेत. वाल्हे येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच बँक ऑफ महाराष्ट्र अशा दोन बँक आहेत.या दोन्ही बँकेमध्ये, वाल्हे व पंचक्रोशीती पिंगोरी, हरणी, मांडकी, दौंडज, पिसुर्टी, राख आदीं ठिकाणाच्या अनेकांची बँक खाते या दोन्ही बँकेमध्ये आहेत.



या परिसरामधील अनेक जण जेजुरी औद्योगिक वसाहतिमधील कंपनीमध्ये कामाला आहेत.या सर्वाचे मासिक पगार बँकेमध्येच जमा होतात.तसेच येथील दूध उत्पादन शेतकरीवर्गाचे दुधाचे पगारही बँकेमध्ये जमा होतात. तसेच लाडकी बहीण योजणा, पीएम किसान योजना, निर्धार योजना आदिंसह अनेकांची बँक खाती आहेत. लोकसंख्येचा दृष्टीने मोठा परिसर तसेच मोठा कामगारवर्ग असलेल्या ठिकाणीच्या बँक ऑफ महाराष्ट्रची सेवा ठप्प झाली असल्याने अनेक ग्राहकांना बँकेत व्यवहार करताना अडथळे येत आहेत.

यामुळे अनेकांना ताटकळत राहावे लागत आहे. तसेच बँक महाराष्ट्रचे एटीएमची सेवाही मागील काही दिवसांपासून ठप्प आहे. मागील दोन-तीन वर्षांपासून पालखी महामार्गाचे विस्तारीकरणाचे काम सुरू असून येथील रस्त्याच्या लगतच गेलेल्या बहुसंख्य केबल तुटत असल्याने मागील काही दिवसांपासून असे अडथळे येत आहेत. असे काहीजण सांगता आहेत. वाल्हेपासून जेजुरी 14 किलोमीटर, तर नीरा 11 किलोमीटर अंतरावर आहे. येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखा विना अडथळा सुरू आहेत.

> वाल्हे येथील शाखेचे कामकाजास मागील काही दिवसांपासून काही तात्रिंक अडचण येत असल्याने शाखेतील गर्दी वाढत आहे. शाखेस बीएसएनएल व ऐरटेल अशा दोन्ही कंपनीचे नेटवर्क सेवा असून यांचे नेटवर्क शाखेस उपलब्ध होण्यास अडथळे येत आहेत. यामुळे शाखेच्या कामकाजास अडथळे निर्माण होत आहेत; यामुळे ग्राहकांची गैरसोय होत आहे. लवकरच ग्राहकांची होणारी गैरसोय दुर करण्यात येईल; ग्राहकांनी सहकार्य करावे.
>
> \- विशाल जाधव, शाखाप्रमुख, वाल्हे